ePaper
“महाकुंभमेळ्यातील चेंगराचेंगरीनंतर मृतदेह नदीत फेकले : जया बच्चन

वर्ष - 8 । अंक - 204 | UDYAM-MH-26-0158827



महाईन्यूज ™

www.mahaenews.com | मंगळवार, दिनांक 4 फेब्रुवारी 2025 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- एवढं ‘मोहोळ’ का उठलंय?
- अनुराग कश्यपची बॉलीवूडबद्दल नाराजी
- राज्याच्या निकालाचे संसदेत पडसाद!
- एकनाथ शिंदे पुन्हा नाराज?

### मुंबईकरांना दिलासा की मालमत्ता करात वाढ?

# मुंबई महापालिकेचा आज अर्थसंकल्प!

## निवडणुकीच्या तोंडावर मुंबईकरांच्या पदरी काय पडणार?

**। मुंबई । महाईन्यूज**

**आशियातील सर्वांत मोठ्या अशा मुंबई महानगरपालिकेचा २०२५-२६चा अर्थसंकल्प आज, मंगळवारी सकाळी सादर होणार आहे. शहराच्या मालमत्ता करात गेल्या दहा वर्षांत वाढ झालेली नाही. त्यामुळे यंदा त्यात वाढ होणार की, मुंबईकरांना दिलासा मिळणार, याकडे लक्ष लागले आहे. मुंबईत सुरू असलेल्या विविध प्रकल्पांच्या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या मुदत ठेवींमध्ये घट झाली आहे का, याबाबतही उत्सुकता आहे. मुदत ठेवींवरून महापालिकेला बऱ्याच टीकेलाही सामोरे जावे लागले आहे.**



मुंबई महापालिकेने मागील वर्षी २०२४-२५चा अर्थसंकल्प सादर करताना, महसूलवाढीसाठी विविध उपाययोजनांची घोषणा केली होती. मात्र या घोषणा कागदावरच राहिल्या आहेत. महिला सुरक्षेसाठी ॲप, प्रदूषणकारी गाड्यांची विल्हेवाट लावण्यासाठी भंगारयार्ड अशा काही नवीन घोषणाही केल्या होत्या. मात्र त्यांचीही अंमलबजावणी होऊ शकलेली नाही. २०२३-२४च्या अर्थसंकल्पात कोणत्याही मोठ्या घोषणा नव्हत्या. जे प्रकल्प हाती घेण्यात आले होते, त्यासाठी भरीव तरतूद केली होती. मात्र त्यावर्षी कोणतीही करवाढ न करता मुंबईकरांना दिलासा देण्यात आला होता. यंदाच्याही अर्थसंकल्पातही करवाढ नसेल, अशी शक्यता आहे. गेल्या दहा वर्षांत मालमत्ता करात वाढ झालेली नाही. दर पाच वर्षांनी मालमत्ता करात १४ टक्के वाढ केली जाते. राज्य सरकारकडून मुंबई महापालिकेला मालमत्ता करांसह अन्य विविध प्रकारची थकबाकी येणे आहे.

### कचरा वर्गीकरण न केल्यास बडगा?

मुंबईत सोसायटी स्तरावर कचऱ्याचे वर्गीकरण योग्य पद्धतीने व्हावे आणि महसुलातही वाढ व्हावी, या उद्देशाने मुंबई महापालिकेकडून आकारल्या जाणाऱ्या दंडात वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी घनकचरा व्यवस्थापन कायदा २०१६मध्ये नवीन दंडाची तरतूद केली आहे. दोन हजार चौरस मीटरपेक्षा अधिक क्षेत्रफळ असलेल्या तसेच दररोज १०० किलोपेक्षा अधिक ओला कचरा निर्माण करणाऱ्या गृहनिर्माण संस्था, आस्थापना, सरकारी कार्यालये, हॉटेले यांना आपल्या आवारातच कचऱ्याची विल्हेवाट लावणे बंधनकारक आहे. याकडे दुर्लक्ष करणाऱ्यांना एक हजार रुपये दंड आकारण्याची तरतूद करण्यात आली आहे. तर वैयक्तिक २०० रुपये दंड आकारला जाईल. यापूर्वी हाच दंड अनुक्रमे ५०० रुपये आणि १०० रुपये होता.

### आदिवासी बांधव घरकुलापासून वंचित राहता कामा नये!

## आमदार सुनील शेळके : कागदपत्रे त्वरित तयार करण्याच्या दिल्या सूचना

**। मावळ । महाईन्यूज**

**मावळचे आमदार सुनील शेळके यांनी जनसंवाद अभियान माध्यमातून पवन मावळ भागातील चावसर, मोरवे व तुंग या गावांना भेट दिली . यावेळी आमदार शेळके यांचे ग्रामस्थांच्या वतीने जोरदार स्वागत करण्यात आले. विधानसभा निवडणूक काळात या गावांमध्ये प्रचार दौऱ्यानिमित्त भेट देणे शक्य होऊ शकले नव्हते, तरी देखील या गावांनी भरभरुन प्रेम व आशीर्वाद दिले आहेत, याबद्दल आमदार शेळके यांनी ग्रामस्थांचे ऋण व्यक्त केले.**



या भागातील ग्रामस्थांच्या रस्ते, वीज, पाणी, शासकीय योजना, स्वस्त धान्य यांबाबतच्या अडचणी प्रत्यक्षपणे जाणून घेत त्या मार्गी लावणे कामी प्रशासनास तात्काळ सूचना देण्यात आल्या. यामध्ये प्रामुख्याने या भागात आदिवासी बांधव मोठ्या प्रमाणात राहत असल्याने त्यांना राहण्यासाठी निवारा उपलब्ध होतं नाही ही खदखद आदिवासी बांधवांनी शेळके यांच्या समोर मांडल्याने तत्काळ शासनाच्या जागेत कसे घरकुल उभे करून देण्यात येईल त्यासाठी लागणारी कागदपत्रे त्यांच्या कडे उपलब्ध नसल्याने त्वरित अन्नपुरवठा विभागामार्फत या भागात कॅम्प घेऊन आदिवासी बांधवांच्या कागद पत्रांची पूर्तता करून घेण्याच्या अधिकाऱ्यांना शेळके यांनी सूचना दिल्या.त्याचप्रमाणे चावसर या गावातील विठ्ठलवाडी परिसरात पिण्याच्या पाण्याची मोठी समस्या होती येथे पाण्याची टाकी बांधण्यासाठी जागा उपलब्ध होत नसल्याने गावाला पाण्यासाठी मोठी भटकंती करावी लागत होती आमदार शेळके यांनी शेतकरी यांच्या सोबत संवाद केल्यानंतर शेतकरी तात्काळ जागा देण्यास तयार झाले त्यामुळे तोही प्रश्न जागीच मिटल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले. याच भागात दौरा करत असताना ठेकेदारने अनेक ठिकाणी रस्ता अर्धवट सोडल्याचे शेळके यांच्या लक्षात येताच ठेकेदाराला लवकरात लवकर ही कामे पूर्ण करण्याच्या सूचना या वेळी देण्यात आल्या.

### अधिकाऱ्यांसह ग्रामस्थ उपस्थित...

यावेळी गटविकास अधिकारी कुलदीप प्रधान, सा. बां. विभागाचे उपअभियंता श्री. धनराज दराडे यांसह महसूल, विद्युत, वन विभाग, अन्न पुरवठा विभाग, ग्रामीण पाणी पुरवठा, जिल्हा परिषद बांधकाम विभाग व पंचायत समितीतील इतर अधिकारी यांच्यासह स्थानिक ग्रामस्थ मोठ्या उत्फुर्तपणे सहभागी झाले होते.

# जी बी एस संसर्गजन्य नाही!

## महाराष्ट्रात पूर्णपणे नियंत्रणात : केंद्रीय आरोग्यमंत्री जे. पी. नड्डा यांची माहिती

### पुणे शहरातील परिस्थिती लवकरच पूर्ववत होण्याचा वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी व्यक्त केला विश्वास

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।


**महाराष्ट्रात विशेष करून पुणे शहरात जी बी एस रुगाणची संख्या वाढत आहे. मात्र हा आजार संसर्गजन्य नाही, यामुळे परिस्थिती पूर्णपणे नियंत्रणात आहे. तसेच राज्यात या आजारांवर लागणारी औषधे पुरेशा प्रमाणात उपलब्ध असल्याचे केंद्रीय आरोग्यमंत्री जे. पी. नड्डा यांनी आज झालेल्या ऑनलाइन बैठकीत सांगितले.**



यावेळी केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव, महाराष्ट्रचे आरोग्य मंत्री प्रकाश अविटकर, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री माधुरी मिसाळ आदीसाह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत केंद्रीय आरोग्यमंत्री जे. पी. नड्डा यांनी सविस्तर आढावा घेत विविध विभागाच्या अधिकाऱ्यांना महत्वपूर्ण सूचना केल्या, यामध्ये ज्या ठिकाणी जी बी एस रुग्ण संख्या वाढत आहेत त्या भागात प्रत्यक्ष पहाणी करण्यात यावी, कुकुट पालन व्यावसाय असलेल्या परिसराला भेटी द्याव्यात. पाणी पुरवठा आणि शुद्धीकरण विभागाने विशेष जलशुद्धीकरण मोहीम राबवावी, ज्या ठिकाणी पाईप लाइन दुरुस्तीची गरज असेल तिथे ती तत्काल करण्यात यावी, तसेच मागील दोन महिन्यातील पाणी पुरवठा आणि आरोग्य विषयक बाबींचा आढावा घ्यावा असे निर्देश प्रशासनाला दिले.

तसेच सर्व रुग्णालयांनी शासनाने ठरवून दिलेल्या एस ओ पी चे पालन करावे असे सांगत रुग्णांना फिजिओ थेरेपी सोबतच मानसिक आरोग्य सुधारण्यासाठी सल्ला देण्याच्या सूचना जे पी नड्डा यांनी दिला.



### आवश्यक त्या सर्व उपाययोजना सुरु

बैठकीबद्दल माहिती देताना वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री माधुरी मिसाळ म्हणाल्या, पुण्यातील जी बी एस रुगाणबद्दलची इत्यंभूत माहिती आम्ही केंद्र सरकारला दिली आहे. राज्यातील जी बी एस परिस्थितीवर आमचे पूर्ण लक्ष असून पुणे महानगर पालिका आणि राज्य सरकार समन्वय साधून ह्या साठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करत आहेत

## तुम्ही आपली मराठी भाषा टिकवली पाहिजे

## अभिनेत्यांना पुरस्कार, आमच्या वाट्याला तिरस्कार : राज ठाकरे

।पुणे । वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पुण्यात तिसरे विश्व मराठी संमेलन आज पार पडले. हे विश्व मराठी संमेलन मराठी भाषा विभागाच्या माध्यमातून आयोजित करण्यात आले होते. आज या संमेलनाच्या समारोपाच्या कार्यक्रमात मनसे अध्यक्ष राज ठाकरे, मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांच्यासह आदी दिग्गज उपस्थित होते. या कार्यक्रमात बोलताना राज ठाकरे यांनी मराठी भाषेसह विविध विषयांवर भाष्य केलं.**

राज्य सरकारने आणि आम्ही-तुम्ही सर्वांनी आपली मराठी भाषा टिकवली पाहिजे, असं आवाहनही राज ठाकरे यांनी केलं. याच कार्यक्रमात राज ठाकरे यांनी एक विधान केलं. 'अभिनेत्यांना पुरस्कार मिळतो, पण आमच्या वाट्याला फक्त तिरस्कार असतो', असं म्हणत राज ठाकरे यांनी तुफान फटकेबाजी केली. तुमच्या मनात आलं असेल की मी या ठिकाणी कसा? हा शासनाचा कार्यक्रम आहे. पण मला उदय सामंत यांनी या कार्यक्रमासाठी बोलावलं. त्यामुळे मला तुमचं सर्वांचं दर्शन झालं. त्यासाठी मी उदय सामंत यांचे आभार मानतो. माझे मित्र अभिनेता रितेश देशमुख यांना माझ्या हस्ते पुरस्कार



देण्यात आला. हे सर्व भाग्यवान माणसं, मी पुरस्कार दिला म्हणून नाही. पण यांना (अभिनेत्यांना) पुरस्कार मिळतात आणि आमच्या वाट्याला फक्त तिरस्कार असतो. तिरस्कार घेऊन आम्हाला पुढे वाटचाल करावी लागते. मराठी भाषेसाठी आपल्याला खूप गोष्टी कराव्या लागतील. सयाजी शिंदे यांनी आता सांगितलं की त्यांनी आफ्रिकेतील व्यक्तीशी मराठीत कसं भांडण केलं. आपण आपल्या भाषेवर नेहमी ठाम राहिलं पाहिजे. कारण जग तुम्हाला त्यानंतरच दाद देतं", असं राज ठाकरे यांनी म्हटलं.दुसऱ्या देशातील माणसं हे आपल्या देशाशी आणि भाषेशी खूप प्रामाणिक असतात. मग त्यांचा अभिमान आपल्यालाही वाटायला लागतो की ते त्यांच्या भाषेशी किती प्रामाणिक आहेत. आपल्या देशात सुद्धा स्वत:च्या भाषेशी प्रामाणिक आहेत. आपल्या देशातील दुसरे राज्य जर त्यांच्या भाषेबाबत एवढा अभिमान बाळगून असतील तर आपण दुसऱ्या भाषेत का बोलतो? एकमेकांना भेटल्यानंतर दुसऱ्या भाषेत कशासाठी बोलतो? आता कार्यक्रमात आपल्याकडे राज्यगीत लागलं होतं. जय जय महाराष्ट्र माझा.., मग भारतातील दुसऱ्या राज्यात कोणत्या राज्याचं राज्यगीत आहे?", असंही राज ठाकरे म्हणाले. "ज्या हिंद प्रांतावर १२५ वर्ष कोणी राज्य केलं असेल तर ते फक्त मराठ्यांनी केलं. ज्यांनी १२५ वर्ष राज्य केलं.

### राज ठाकरे काय म्हणाले?

मराठी भाषेसाठी जे-जे आम्ही करू त्यासाठीही ते पाठिंबा देतील अशी देखील अपेक्षा आहे. पण तेव्हा आमच्यावर गुन्हे दाखल करू नका. आतापर्यंत आलेला अनुभव आहे. कारण आम्ही जे करत आहोत ते मराठी भाषेसाठी आणि महाराष्ट्रासाठीच करत आहोत",मी उदय सामंत यांचे आभार मानतो. माझे मित्र अभिनेता रितेश देशमुख यांना माझ्या हस्ते पुरस्कार देण्यात आला. हे सर्व भाग्यवान माणसं, मी पुरस्कार दिला म्हणून नाही. पण यांना (अभिनेत्यांना) पुरस्कार मिळतात आणि आमच्या वाट्याला फक्त तिरस्कार असतो. तिरस्कार घेऊन आम्हाला पुढे वाटचाल करावी लागते. मराठी भाषेसाठी आपल्याला खूप गोष्टी कराव्या लागतील.

## आळंदीतील अनधिकृत वारकरी शिक्षण संस्थांवर

# 48 तासात कारवाई करा!

## राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांचे निर्देश

। पिंपरी- चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**आळंदीतील अनधिकृत वारकरी शिक्षण संस्थांवर ४८ तासात कारवाई करण्याचे निर्देश राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी दिले. आळंदी परिसरातील वारकरी विद्यार्थी वसतीगृहांमध्ये होणाऱ्या बालकांच्या लैंगिक शोषण संदर्भात महिला आयोगाकडे प्राप्त झालेल्या तक्रारींच्या अनुषंगाने वारकरी शिक्षण संस्थांची पाहणी करत आतापर्यंत झालेल्या पोलीस तपासाचा आढावा त्यांनी आज घेतला.**



यावेळी पोलीस उपअधीक्षक शिवाजी पवार, आयोगाच्या सदस्य सचिव श्रीमती नंदिनी आवडे, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी मनीषा बिरारीस, प्रांताधिकारी अनिल दौंडे, तहसीलदार ज्योती देवरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक बी. एस.नरके, मुख्याधिकारी कैलास केंद्रे तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

पोलीस तपासाचा आढावा घेतल्यानंतर श्रीमती चाकणकर म्हणाल्या, वारकऱ्यांचे श्रद्धास्थान असलेल्या आळंदीमध्ये वारकरी शिक्षण संस्थांमध्ये गैरप्रकार सुरू असल्याच्या व मुलांचे लैंगिक शोषण होत असल्याच्या अनेक तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. गुन्हा दाखल झालेल्या प्रकरणी पोलिसांनी तातडीने तपास करावा. तसेच पोलीसांनी पुढाकार घेत, मुलांना विश्वासात घेऊन अजून असे प्रकार झाले असतील तर त्या दृष्टीने ही कारवाई करावी असे त्यांनी सांगितले.

बालकांच्या हक्काचे संरक्षण करण्यासाठी शासनाच्या महिला व बालविकास विभागाच्या शासन निर्णयानुसार खाजगी वसतीगृहांसाठी नियमावली करण्यात आली आहे. या नियमावलीचे पालन न करणाऱ्या संस्थांचा अहवाल सात दिवसात सादर करावा. संस्था सुरू करण्यासाठी जिल्हा महिला व बालविकास विभाग यांची परवानगी तसेच धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडे नोंदणी आवश्यक आहे. नोंदणी नसलेल्या संस्थांवर दोन दिवसात कारवाई करा असे त्यांनी सांगितले.

त्या पुढे म्हणाल्या, परवानगी असलेल्या परंतु नियमावलीचे पालन न करणाऱ्या संस्थांची मान्यता रद्द करण्यात यावी. नियमावलीनुसार मुला- मुलींची निवास व्यवस्था स्वतंत्र करण्यात यावी. वसतीगृहांमध्ये आवश्यक कर्मचारी वर्ग असावा, पुरेशी निवास व्यवस्था, स्वतंत्र अभ्यासिका, बालकांच्या संख्येनुसार स्नानगृहे, स्वच्छतागृहे असावीत.

### वारकरी शिक्षण संस्थेविषयी तक्रारी

पालकांच्या विनंती अर्जानुसार बालकांना संस्थेमध्ये प्रवेश द्यावा, पुरेसे स्वच्छ व निर्जंतुक पिण्याचे पाणी इत्यादी नियमांचे तंतोतंत पालन संस्थांनी करावे असेही त्यांनी सांगितले. स्थानिक पातळीवर पोलीस विभाग, महिला व बाल विकास, महसूल, नगरपालिका, शिक्षण व स्थानिक ग्रामस्थ यांची समिती करण्यात येईल. या समितीकडून संस्थांची वारंवार तपासणी करून त्याचा अहवाल शिक्षण विभागात सादर करावा, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. यावेळी त्यांनी आळंदीतील ग्रामस्थांसोबत संवाद साधून त्यांच्या वारकरी शिक्षण संस्थेविषयी तक्रारी जाणून घेतल्या. स्थलांतरित संस्था तसेच वारकरी शिक्षण संस्थांना भेटी देऊन विद्यार्थी संख्या, त्यांची राहण्याची व्यवस्था, संस्थेतील विद्यार्थी नोंदणी रजिस्टर आदींची पाहणी केली.

---

## मायेची शाल, छातीची ढाल बनून माताभगिनींसाठी तत्पर

## तुषार कामठे : पिंपळे निलख येथे हळदी कुंकू समारंभ व खेळ पैठणीचा कार्यक्रमास महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

। पिंपळे निलख ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**'माझ्या कुठल्याही माताभगिनीवर कसलाही अन्याय अत्याचार झाला तर हा तुषार गजानन कामठे तुमचा भाऊ तुमचा मुलगा म्हणून मायेची शाल आणि छातीची ढाल बनून माताभगिनींसाठी तत्पर असेल' असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष तुषार कामठे यांनी केले. तुषार गजानन कामठे सोशल फाउंडेशन च्या वतीने पिंपळे निलख येथे महिला भगिनींसाठी आयोजित भव्य हळदी कुंकू समारंभ व खेळ पैठणीचा, सन्मान महिलांचा या कार्यक्रमात ते बोलत होते.**



वसंत पंचमीचे औचित्य साधत तुषार कामठे यांनी खास महिला भगिनींसाठी हळदी कुंकू व खेळ पैठणीचा हा मनोरंजनात्मक कार्यक्रम आयोजित केला होता, ज्यामध्ये महिलांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. सुप्रसिद्ध निवेदक संदीप पाटील यांनी यावेळी सूत्रसंचालन करत महिला भगिनींना विविध खेळ, गाणी मनोरंजनात्मक किस्से सांगून रंगत आणली. कार्यक्रमात सहभागी होणाऱ्या प्रत्येक महिलेला आकर्षक भेटवस्तू यावेळी देण्यात आल्या.

तसेच पहिल्या तीन विजेत्या महिलांना अनुक्रमे स्मार्ट टीव्ही सह मानाची पैठणी, फ्रिज आणि कुलर अशी बक्षिसे यावेळी देण्यात आली. त्याचबरोबर लकी ड्रॉ च्या माध्यमातून तीन महिलांना सोन्याची नथही यावेळी देण्यात आली.

### महिलांसाठी पिंक ई-रिक्षा

महिला व बालकल्याण विभाग महाराष्ट्र शासन यांच्याद्वारा, महिला व युवतींना आत्मनिर्भर, स्वावलंबी, सशक्तीकरणास चालना देण्यासाठी पिंक ई-रिक्षा योजना महाराष्ट्रात राबविण्यात येत आहे, या योजनेची सविस्तर माहिती देत कार्यक्रमाच्या ठिकाणी तीन गरजू महिला भगिनींना पिंक ई रिक्षाचे वाटप करण्यात आले.


त्याचबरोबर पहिल्या दहा इच्छुक महिलांचे डाऊन पेमेंट तुषार कामठे यांच्या वतीने दिले जाणार असल्याचे त्यांनी यावेळी जाहीर केले. पिंक ई रिक्षा योजना ही महिला भगिनींना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी राज्य सरकारची महत्त्वपूर्ण योजना आहे, यामध्ये सरकारी अनुदानातून महिलांना पर्यावरणपूरक ई-रिक्षा 70 टक्के कर्जाच्या माध्यमातून मिळणार आहे, लाभार्थी महिलांना केवळ 10 टक्के खर्च करावा लागणार असून कर्जाच्या परतफेडीसाठी 5 वर्षे कालावधी असेल. या योजनेचा जास्तीत जास्त महिलांनी लाभ घ्यावा असे आवाहन तुषार कामठे यांनी यावेळी केले.

### माता भगिनींच्या रक्षणासाठी तत्पर

2017 साली नगरसेवक म्हणून पिंपळे निलख वासियांनी मला काम करण्याची संधी दिली, तेव्हापासून करदात्या नागरिकांच्या न्याय व हक्कासाठी त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी संघर्ष करत आलो, जनतेच्या हिताविरुद्ध होत असलेला भ्रष्टाचार रोखण्यासाठी सत्तेत असताना राजीनामा देणारा मी नगरसेवक होतो, अत्यंत संघर्ष करून मायबाप जनतेच्या आशीर्वादाने कोट्यावधीची कामे या प्रभागात करू शकलो याचा अभिमान वाटतो.. यापुढेही जनतेच्या हितासाठी अहोरात्र कटीबद्ध राहणार असून माता भगिनींवर अन्याय अत्याचार सहन केला जाणार नाही, सर्व माता भगिनींच्या संरक्षणासाठी त्यांच्या पाठीशी ठामपणे उभा असेल असा शब्द देतो.. असे मनोगत यावेळी तुषार कामठे यांनी व्यक्त केले.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने

### नामाने सद्बुद्धी उत्पन्न होते



कौरवांनी पांडवांना निदान पाच गावे तरी द्यावीत, म्हणजे युद्धाचा प्रसंग टळेल, म्हणून भगवान् श्रीकृष्ण स्वत: दुर्योधनाकडे शिष्टाई करण्याकरिता गेले. त्यावेळी दुर्योधनाने सांगितले की, 'देवा, तू म्हणतोस ते सर्व बरोबर आहे. न्यायाच्या दृष्टीने तू म्हणतोस तसे काहीतरी करणे जरूर आहे. पण तसे करण्याची मला बुद्धीच होत नाही, त्याला मी काय करू ? तू सर्वसत्ताधीश आहेस, तर मग माझी बुद्धीच पालट म्हणजे सर्वच प्रश्न एकदम मिटेल !' परंतु तसे काही न होता पुढे युद्ध झाले हे प्रसिद्धच आहे. तीच स्थिती रावणाच्या बाबतीतही दिसते. म्हणून, सगुणरूपी अवताराने वासना किंवा बुद्धी पालटण्याचे कार्य होऊ शकत नाही असे दिसते. सद्बुद्धी उत्पन्न करण्याचे सामर्थ्य फक्त भगवंताच्या नामातच आहे. म्हणूनच त्रिकालाबाधित असणाऱ्या नामावताराची आता जरुरी आहे. नाम म्हणजे भगवंतच आहे. ते नाम अनन्य होऊन आपण घेऊ या. एका माणसाची प्रकृती बरी होती पण त्याच्या पायामध्ये काहीतरी दोष उत्पन्न झाला. डॉक्टर म्हणाला की, "जीव वाचवायचा असेल, बाकीचे सर्व शरीर टिकवायचे असेल, तर पाय कापायला हवा." आता, नुसता प्राण आहे पण हात हलत नाही, पाय हलत नाही, डोळ्यांनी दिसत नाही, कानांनी ऐकू येत नाही, पण प्राण आहे, तर उपयोग नाही. याउलट, बाकी सगळे आहे पण प्राण नाही, तरीही उपयोग नाही. प्राण आहे पण बाकीच्या गोष्टींपैकी एखादी नसली तर चालू शकेल. समजा, कानाने ऐकू येत नाही; नाही तर नाही ! कुठे बिघडले? उपासना, अनुसंधान, हे प्राणासारखे समजावे; बाकी व्याप आहे तो शरीराच्या इंद्रियांप्रमाणे समजावा. यात भगवंताचे अनुसंधान चुकले तर प्राणच गमावल्यासारखे आहे; ते सांभाळून जे करता येईल तेवढेच करणे जरूर आहे. ते न सांभाळता बाकीच्या गोष्टी केल्या तर अंती निराशा आहे.

आमच्या मनासारख्या गोष्टी होत नाहीत म्हणून आम्ही दु:खी आहोत असे म्हणण्यापेक्षा, ती गोष्ट आमच्या मनात आहे हेच दु:खमूळ आहे. अमकी गोष्ट सुखदायक आहे ही जी कल्पना आहे, तीच दु:खमूळ आहे, हे समजून आपण वागले पाहिजे. मांजर उंदराशी खेळते; ते त्याला धरील, परत सोडील, पुन: धरील, पुन: सोडील, पण शेवटी प्राण घेईलच त्याचा. तसे काळ आपल्याशी करतो आहे; आशेत गुंतवून ठेवील, पुढे जाईल. आपण पहिल्यापासूनच हे ओळखून राहावे की असे गुंतून राहण्यात काही फायदा नाही, आणि अनुसंधान ठेवले तरच मनुष्याचे कल्याण होईल. नाही तर फार कठीण आहे. मी-मी म्हणणारे, दुसऱ्याला ज्ञान सांगणारे, विद्वान, शास्त्री, पंडित सर्व खरे भ्रमातच आहेत. म्हणून म्हणतो, एक करा - अनुसंधान टिकवून जेवढे करता येईल तेवढेच करा.

# 'बजेट ने दिया छप्पर फाड के !



'स्टेट'मेंट

अधिकराव दिवे-पाटील

संस्थापक, संपादक

**जगामध्ये भारताला मोठी आर्थिक ताकद बनवण्याची जिद्द बाळगणाऱ्या कर्तव्यदक्ष पंतप्रधान आदरणीय नरेंद्र मोदी यांच्या सरकारमधील सलग आठवा अर्थसंकल्प अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सादर केला. पाच ट्रिलियनची अर्थव्यवस्था आणि जगातील तीन बलाढ्य राष्ट्रांमध्ये गणना हे नरेंद्र मोदी यांचे स्वप्न साकार करण्याच्या दिशेने टाकलेले हे पाऊल आहे, असे मानायला मुळीच हरकत नाही !**



वर्षानुवर्षे भारताचा अर्थसंकल्प जनता पाहत आहे, अनुभवत आहे.. पण, जनतेवर कोणकोणते कर लादायचे आणि वसुली करायची, यासाठी आत्तापर्यंतचे अर्थसंकल्प सादर केले गेले. पहिल्यांदाच सरकारच्या वसुलीवर ध्यान न देता जनतेला काय द्यायचे याची प्रचिती या अर्थसंकल्पामुळे आली आहे. निर्मला सीतारामन यांचा हा अर्थसंकल्प म्हणजे जनतेसाठी 'छप्पर फाड के' आहे असेच म्हणावे लागेल!

#### मध्यमवर्ग तुफान खुश..

नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पार्टीचा पाठीराखा असलेल्या मध्यमवर्गाला खूश करण्याचा प्रयत्न या अर्थसंकल्पातून झालेला दिसतो. बारा लाखापर्यंतचे उत्पन्न हे कर माफ करण्यात आल्यामुळे देशातील सर्वात मोठा वर्ग तुफान खुश झाला आहे, हे वेगळे सांगायला नको.

#### दिल्ली आणि बिहार लक्ष्य

या अर्थसंकल्पात मध्यमवर्गीयांना खूश करताना त्यामागे दिल्ली विधानसभेच्या निवडणुका आणि बिहार विधानसभेच्या आणखी काही महिन्यांनी होणाऱ्या निवडणुकीचा विचार केलेला दिसतो. पंतप्रधान मोदी यांनी काही दिवसांपूर्वी मंत्रिमंडळाच्या बैठकीत आठव्या वेतन आयोगाचा विषय मंजूर करून घेऊन 'मास्टर स्ट्रोक' मारला होता. आता, अर्थमंत्री सीतारामन यांनी या अर्थसंकल्पात दुसरा असा 'मास्टर स्ट्रोक' मारला आहे. त्याचे परिणाम दिल्ली आणि बिहार विधानसभेच्या निवडणुकीत भाजपला दिसू शकतील. या दोन 'मास्टर स्ट्रोक्स' मुळे भाजपा विजयाच्या उंबरठ्यावर निवडणुकीपूर्वीच येऊन बसला आहे.

#### केजरीवाल यांची अपेक्षा पूर्ण

या अर्थसंकल्पाअगोदर दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी अर्थसंकल्पातून मध्यमवर्गीयांच्या काही अपेक्षा सांगत मोदी यांच्याकडे काही मागण्या केल्या होत्या. परंतु, दिल्ली विधानसभेची निवडणूक आचारसंहिता लागू असल्याने केंद्रीय अर्थमंत्र्यांना दिल्लीसाठी विशेष योजना जाहीर करणे शक्य नव्हते. असे असले, तरी दिल्लीत राहणाऱ्या एकूण मध्यमवर्गीयांची संख्या आणि त्यांचे मतदानातील प्रमाण लक्षात घेऊन या वेळी हा मध्यमवर्ग आपल्या पाठीशी कसा राहील, याची व्यूहरचना आखल्याचे अर्थसंकल्पातील घोषणातून दिसते.

दिल्लीतील मध्यमवर्ग हा गेल्या काही वर्षात भाजपाकडून केजरीवाल यांच्या 'आप'कडे वळाला होता, तर दिल्लीतील गोरगरीब जनता काँग्रेसकडून 'आप'च्या पाठीशी राहण्याची शक्यता दिसत नव्हती. त्यामुळे मध्यमवर्गाला 'आप' कडून खेचून घेण्याचा प्रयत्न भाजपने केला आहे आणि त्यात यशही आले आहे. गेल्या २७ वर्षांपासून दिल्लीत भाजपच्या दृष्टीने असलेला दुष्काळ संपवायचा आहे. १९९९ नंतर दिल्लीची सत्ता भाजपाकडे आलेली नाही. ही सत्ता आणायची असेल, तर मध्यमवर्ग आपल्या पाठीशी उभा असला पाहिजे, हे लक्षात घेऊन प्राप्तिकर स्लॅबमध्ये सीतारामन यांनी मोठ्या घोषणा केल्या.

#### निवडणूक अगदी तोंडावर

दिल्लीमध्ये येत्या पाच तारखेला विधानसभेच्या निवडणुका आहेत. 'पीपल रिसर्च ऑन इंडियाज कंझ्युमर इकॉनॉमी' या संस्थेच्या का अहवालानुसार दिल्लीत ६७ टक्के लोक मध्यमवर्गीय आहेत आणि मध्यमवर्ग हा बोलघेवडा वर्ग आहे. तसाच तो मतदान घडवणारा आहे, हे लक्षात घेऊन प्राप्तिकरात अधिक सवलती दिल्या तर दिल्लीतला मध्यमवर्ग आपल्या पाठीशी राहील, याची खूणगाठ मनाशी बांधून अर्थमंत्र्यांनी नवी खुश करणारी करप्रणाली जाहीर केली आहे आणि तिचा उपयोगी होणार आहे.

#### महागाई रोखण्यावर भर

एरवी स्वस्त होणाऱ्या वस्तू आणि महाग होणाऱ्या वस्तूंचे प्रमाण अर्थसंकल्पात समसमान असते. परंतु, या वेळच्या अर्थसंकल्पावर नजर टाकली तर महाग होणाऱ्या गोष्टी अतिशय कमी म्हणजे हाताच्या बोटावर मोजण्याइतक्या आहेत. तर स्वस्त होणाऱ्या वस्तू अधिक असून, या वस्तूंचा वापर करता बहुतांश मध्यमवर्ग करीत असतो. त्यामुळे एकीकडे मध्यमवर्गाला प्राप्तिकरात मोठ्या प्रमाणात सवलती द्यायच्या, त्याचबरोबर त्यांनी वाचवलेली ही रक्कम गुंतवणुकीकडे जाणार नाही, तर ती बाजारात पुन्हा कशी येईल आणि बाजारात गेल्या काही महिन्यांपासून असलेली मंदी दूर कशी होईल याचा विचार अर्थमंत्र्यांनी प्राप्तिकर रचनेत बदल करताना केलेला दिसतो.

#### बळीराजाकडे पाहण्याची सकारात्मक दृष्टी

सरकारने आरोग्यासाठी कोणतीही मोठी घोषणा केलेली नाही, असे म्हणणाऱ्यांना मोठी चपराक देण्यात आली आहे. कर्करोगावरची औषधे स्वस्त करण्याचा निर्णय घेतला आहे. अर्थात ती किती स्वस्त होतील, हे अर्थमंत्र्यांच्या भाषणातून अद्याप स्पष्ट होत नाही. त्याचबरोबर सहा जीवरक्षक औषधांवरील सीमाशुल्क पाच टक्के करून ही औषधे स्वस्त करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. शेतकऱ्यांच्या क्रेडिट कार्डवर यापूर्वी तीन लाख रुपयांपर्यंतचे कर्ज मिळत होते. आता त्यात दोन लाख रुपयांपर्यंत वाढ करण्यात आली आहे. हा चांगला निर्णय घेतल्यामुळे शेतकऱ्यांना आता अधिक कर्जासाठी सावकारांच्या दारात जावे लागणार नाही.

भारतातली शेतीची उत्पादकता ही जगात सर्वात कमी आहे. एकरी उत्पादकता वाढल्याशिवाय शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढणार नाही, हे लक्षात घेऊन सरकारने एकरी उत्पादकता वाढवण्यावर दिलेला भर निश्चितच चांगला आहे. देशातील शंभर जिल्हे निवडून त्या जिल्ह्यात एकरी उत्पादकता वाढवण्याचा भर देण्याची मोहीम हाती घेण्यात आली आहे. युरियाच्या निर्मितीवर भर दिला आहे.

#### उद्योग क्षेत्राला झुकते माप

देशाच्या विकासात पायाभूत क्षेत्र आणि लघु व मध्यम उद्योगाच्या क्षेत्रातील रोजगार हाच सर्वाधिक रोजगार असतो. एकीकडे युवकांना रोजगार उपलब्ध होत नाहीत. दुसरीकडे केंद्र सरकार आता कौशल्य विकास प्रशिक्षण योजनांवर अधिक खर्च करत आहे. अशावेळी रोजगार निर्मिती जिथे होईल, अशा घटकांना अधिक प्रोत्साहन देण्या साठी पावले उचलली आहेत.

#### महिलांचे सशक्तिकरण आणि सबलीकरण

या अर्थसंकल्पात देशातील महिलांचे सशक्तिकरण आणि सबलीकरणावर चांगलाच भर देण्यात आला आहे. महिलांची खुशी म्हणजे निम्मा देश खुश.. हा ठोकताळा अर्थमंत्र्यांनी समोर ठेवला आहे. थोडक्यात काय, महिला बळीराजा युवावर्ग आणि गोरगरीब असे सर्वजण खुश करण्याचा प्रयत्न नरेंद्र मोदी सरकारने केला असून त्यात त्यांना अफलातून यश मिळाले आहे, हे मान्य करावेच लागेल !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.

**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# एकनाथ शिंदे पुन्हा नाराज?

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बोलावलेल्या कॅबिनेट बैठकीला शिंदे अनुपस्थित

| मुंबई |
प्रतिनिधी : महाईन्यूज |

**राज्यात पुन्हा एकदा महायुतीचं सरकार सत्तेमध्ये आलं, महायुतीला प्रचंड बहुमत मिळालं. भाजप हा राज्यात सर्वात मोठा पक्ष ठरला. मात्र गेल्यावेळी देवेंद्र फडणीस हे उपमुख्यमंत्री होते. तर एकनाथ शिंदे हे मुख्यमंत्री होते. यावेळी देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री आहेत तर एकनाथ शिंदे त्यांच्या मंत्रिमंडळामध्ये उपमुख्यमंत्री आहेत. नव्या मंत्रिमंडळाच्या शपथविधीपूर्वी एकनाथ शिंदे हे नाराज होते, त्यामुळे ते आपल्या मुळगावी दरेगावला गेल्याची चर्चा रंगली, त्यानंतर पालकमंत्रिपदावरून देखील एकनाथ शिंदे नाराज झाल्याची माहिती समोर आली होती, त्यावेळी देखील ते दरेगावला गेले होते. दरम्यान आता पुन्हा एकदा एकनाथ शिंदे हे नाराज असल्याची चर्चा सुरू झाली आहे, त्याचं कारण देखील समोर आलं आहे.**



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बोलावलेल्या कॅबिनेट बैठकीला उपस्थित नव्हते. त्यानंतर आता त्यांनी फडणवीसांनी बोलावलेल्या आणखी एका महत्त्वाच्या बैठकीला दांडी मारली आहे. त्यामुळे एकनाथ शिंदे हे पुन्हा एकदा नाराज असल्याच्या चर्चेला उधाण आलं आहे. काही महत्त्वाच्या प्रकल्पांवर चर्चा करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बैठक बोलावली होती. या बैठकीला उपमुख्यमंत्री अजित पवार उपस्थित होते. मात्र एकनाथ शिंदे या बैठकीला हजर नव्हते. एकनाथ शिंदे यांच्या पक्षाच्या वतीनं गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी या बैठकीला हजेरी लावली.

दरम्यान यापूर्वी देखील पालकमंत्रिपदाच्या वाटपावरून एकनाथ शिंदे यांनी नाराजी व्यक्त केली होती. दादा भुसे आणि भरत गोगावले यांना पालकमंत्रिपद मिळावं अशी एकनाथ शिंदे यांची इच्छा होती. मात्र नाशिकचं पालकमंत्रिपद गिरीश महाजन तर रायगडचं पालकमंत्रिपद आदिती तटकरे यांना मिळालं. त्यामुळे शिंदे नाराज झाल्याची माहिती समोर आली होती. ते त्यानंतर आपलं मुळगाव असलेल्या दरेगावला गेले होते. शिंदेंच्या नाराजीनंतर या दोन जिल्ह्यांच्या पालकमंत्रिपदाला स्थगिती देण्यात आली. दरम्यान आता पुन्हा एकदा एकनाथ शिंदे हे फडणवीसांनी बोलावलेल्या कॅबिनेट बैठकीला गैरहजर राहिले, त्यानंतर बोलावलेल्या या महत्त्वाच्या बैठकीला देखील त्यांनी दांडी मारल्यानं पुन्हा एकदा त्यांच्या नाराजीची चर्चा सुरू झाली आहे.

### नाराजीच्या चर्चेवर एकनाथ शिंदे बोलले

गेल्या काही दिवसांपासून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे नाराज असल्याची चर्चा सुरू आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बोलावलेल्या कॅबिनेटच्या बैठकीला देखील ते उपस्थित नव्हते, तसेच त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी महत्त्वाच्या प्रकल्पांबाबत आणखी एक बैठक बोलावली होती, या बैठकीला देखील शिंदे यांनी दांडी मारली. त्यानंतर एकनाथ शिंदे हे नाराज असल्याची चर्चा सुरू झाली. यावर आता एकनाथ शिंदे यांनी मोठा खुलासा केला आहे. तसेच यावेळी बोलताना त्यांनी विरोधकांवर देखील जोरदार हल्लाबोल केला आहे. रखडलेले प्रकल्प आणि विकासाचे प्रकल्प यांना आपण चालना दिली, लोकाभिमुख कल्याणकारी योजना आपण सुरु केल्या. लाडकी बहीण योजना यशस्वी झाली, लाडका भाऊ, लाडके शेतकरी, ज्येष्ठ लोकांसाठी देखील योजना आपण आणल्या, एसटीमध्ये महिलांना 50 टक्के सवलत आपण दिली. लेक लाडकी लखपती योजना आपण सुरू केली. विधानसभा निवडणुकीत महिलांनी मोठा विजय मिळवून दिला. विरोधकांचं डिपॉझिट जप्त केलं. त्यामुळे आता सरकारची जबाबदारी आणखी वाढली आहे. विरोधक कितीही काय बोलले तरी लाडकी बहीण योजना कधीच बंद होणार नाही .जे आम्ही बोलतो ते करतो, असं एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. दरम्यान एकनाथ शिंदे हे नाराज असल्याची चर्चा सध्या सुरू आहे, यावर देखील त्यांनी यावेळी प्रतिक्रिया दिली. मी समाधानी आहे .पद येतात आणि जातात पद वर खाली होतात. यावेळेस या राज्यातल्या लाडक्या बहिणींचा लाडका भाऊ म्हणून माझी ओळख निर्माण झाली. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री पदापेक्षा माझ्यासाठी हे सर्वात मोठ पद आहे, असे मी मानतो, असं एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे.

# “महाराष्ट्रातील जनता माफ करणार नाही”

## फडणवीसांचे विधानसभा निवडणुकीच्या मुद्द्यावर राहुल गांधींना प्रत्युत्तर

| कोल्हापूर |
प्रतिनिधी : महाईन्यूज |

**लोकसभेतील विरोधीपक्ष नेते आणि काँग्रेसचे खासदार राहुल गांधी यांनी सोमवारी राष्ट्रपतींच्या अभिभाषणाला उत्तर दिले. यावेळी राहुल गांधी यांनी चीनपासून ते बेरोजगारी अशा अनेक मुद्द्यांवर भाजपा सरकारवर टीका केली. या भाषणात राहुल गांधी यांनी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत अचानक वाढलेल्या मतदारांच्या संख्येबाबत काही प्रश्न उपस्थित केले. त्यांनी मतदार याद्यांमध्ये फेरफार झाल्याचा आरोपही केला.**





दरम्यान राहुल गांधी यांच्या आरोपांनंतर भारतीय जनता पक्षाकडून प्रत्युत्तर दिलं जात आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राहुल गांधींनी महाराष्ट्राच्या जनतेचा अपमान केल्याचा आरोप करत राहुल गांधींनी माफी मागवी अशी मागणी केली आहे. “महाराष्ट्राचा अपमान करण्याऐवजी आत्मपरीक्षण करा” , असे फडणवीस म्हणाले आहेत.

### राहुल गांधी काय म्हणाले?

राहुल गांधी लोकसभेत बोलताना म्हणाले की, महाराष्ट्रात लोकसभा निवडणूक आणि विधानसभा निवडणुकीमधील पाच महिन्यांत मतदारांची संख्या सुमारे ७० लाखांनी वाढली. फेरफार झाल्याचा आरोप करत त्यांनी यासंबंधी आकडेवारी विश्लेषणासाठी उपलब्ध करून देण्याची मागणी देखील त्यांनी केली. राहुल गांधी आपल्या भाषणात म्हणाले की ते आरोप करत नाहीयेत मात्र आयोगाने यावर उत्तर दिले पाहिजे.

राहुल गांधी म्हणाले की, “मला महाराष्ट्र निवडणुकीबद्दल बोलायचे आहे. जवळपास हिमाचल प्रदेशच्या संपूर्ण लोकसंख्ये इतके मतदार महाराष्ट्राच्या मतदार यादीत समाविष्ट करण्यात आले. लोकसभा निवडणुकीनंतर, विधानसभा निवडणुकीपूर्वी महाराष्ट्रात ७० लाख नवे मतदार अचानक तयार झाले”. राहुल गांधी यांचे म्हणणे होते की, महाराष्ट्रात पाच वर्षांच्या कालावधीत जेवढे मतदार वाढले नाहीत त्याहून जास्त मतदार अवघ्या पाच महिन्यांत वाढले. दरम्यान राहुल गांधी यांच्या वक्तव्यानंतर भाजपाकडून त्यांच्यावर महाराष्ट्राचा अपमान केल्याचा आरोप करण्यात येत आहे.

### चिखलफेक करत आहात...


राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर पोस्ट केली आहे. या पोस्टमध्ये फडणवीस म्हणाले की, “महाराष्ट्राचा अपमान करण्याऐवजी आत्मपरीक्षण करा! तुम्ही छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, वीर सावरकर यांच्या भूमीचा, महाराष्ट्रातील जनतेचा अपमान केला आहे. तुमच्या पक्षाचा पराभव झाल्यामुळे तुम्ही महाराष्ट्रातील जनतेने एनडीएला लोकशाहीच्या मार्गाने दिलेल्या जनादेशावर प्रश्नचिन्ह उभे केले आहे”. “आत्मनिरीक्षण करण्याऐवजी तुम्ही चिखलफेक करत आहात. यासाठी महाराष्ट्रातील जनता तुम्हाला माफ करणार नाही. राहुल गांधी माफी मागा!”, असेही फडणवीस म्हणाले आहेत.

# राज्याच्या निकालाचे संसदेत पडसाद!

## निवडणूक आयोगाच्या निष्पक्षतेवर राहुल गांधींकडून शंका

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीच्या निकालांचे पडसाद सोमवारी संसदेत उमटले. शिर्डीमध्ये एकाच इमारतीत ७ हजार नवे मतदार यादीमध्ये सामील केल्याचा दावा करत लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी निकालावर शंका उपस्थित केली. मतदार अचानक आले कुठून, असा प्रश्न विचारत त्यांनी केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निष्पक्षतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.**



राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील आभार प्रस्तावावर लोकसभेत सोमवारी चर्चा सुरू झाली. यावेळी गांधी यांनी देशातील निवडणूक प्रक्रियांबाबत साशंकता व्यक्त केली. "महाराष्ट्रामध्ये लोकसभा निवडणूक आम्ही (इंडिया आघाडी) जिंकलो. त्यानंतर सहा महिन्यांनी झालेल्या विधानसभा निवडणुकीत ७० लाख नव्या मतदारांची नावे यादीमध्ये सामाविष्ट केली गेली. लोकसभा आणि विधानसभा या दोन्ही निवडणुकांमध्ये इतक्या मोठ्या संख्येने अतिरिक्त मतदार कसे समाविष्ट केले जाऊ शकतात? हा सगळा प्रकारच गोलमाल आहे," भाजपने जिंकलेल्या मतदारसंघांमध्ये मोठ्या संख्येने मतदार वाढल्याचा गंभीर आरोप गांधींनी केला. महाराष्ट्राच्या निवडणुकीच्या मुद्द्यावरून राहुल गांधी केंद्रीय निवडणूक आयोगावर शरसंधान साधत असताना लोकसभेमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदीही उपस्थित होते. निवडणुकीचे निकाल भाजपसाठी अडचणी असल्याचे सूचित करत, 'बघा, पंतप्रधान मोदी माझ्याकडे बघतदेखील नाहीत', असा टोमणा राहुल गांधींनी लगावला. या टिप्पणीवर सभागृहात भाजपचे सदस्य आक्रमक झाले.

### निवडणूक आयोगावर टीका

राज्यात अचानक इतके मतदार कसे वाढले, याची शहानिशा करण्यासाठी आम्ही केंद्रीय निवडणूक आयोगाकडे मतदारांची नावे, पत्ता आणि मतदान केंद्र याची माहिती मागितली होती. काँग्रेस, शिवसेना (ठाकरे) व राष्ट्रवादी (शरद पवार) गट हे 'इंडिया' आघाडीतील घटक पक्ष ही माहिती तपासून पाहतील, असे सांगितले होते. मात्र, आयोग आम्हाला माहिती देणार नाही याची खात्री असल्याची उपहासात्मक टिप्पणी गांधी यांनी केली.

### आयुक्त निवडीवर सवाल

केंद्रीय निवडणूक आयुक्तांच्या निवडीमध्ये केंद्र सरकार मनमानी करत असल्यामुळे मतदानाची तारीख बदलली जाते, निवडणुका लांबणीवर टाकल्या जातात, असा आरोप राहुल गांधींनी केला. "आधी निवड समितीच्या सदस्यांमध्ये सरन्यायाधीशांचा समावेश होता. मात्र सरकारने सरन्यायाधीशांना काढून टाकले. आता पंतप्रधान मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि विरोधी पक्षनेता म्हणून मी असे समितीमध्ये आहोत. मोदी आणि शहा बहुमताने निर्णय घेणार आणि मला त्यांचा निर्णय मान्य करावा लागणार. सरन्यायाधीश सदस्य असते तर समितीमध्ये सविस्तर चर्चा झाली असती. आता मी या समितीच्या बैठकीला कशासाठी जायचे हा मला प्रश्न पडला आहे," असे ते म्हणाले.

### ट्रम्प शपथविधीवरून टोलेबाजी

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या शपथविधी सोहळ्याचे पंतप्रधान मोदींना आमंत्रण नव्हते. परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर त्यासाठी मध्यस्थी करण्याकरिता अमेरिकेला गेले होते, असा गंभीर आरोप राहुल गांधी यांनी लोकसभेत केला. यावर संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी आक्षेप घेतला. तर जयशंकर यांनीही 'एक्स'वरील संदेशात राहुल गांधींचा दावा फेटाळून लावला.

### दिल्लीसाठी ईश्वर किंवा मोदीच!

दिल्लीचा विकास केवळ ईश्वर किंवा पंतप्रधान नरेंद्र मोदीच करू शकतात असा दावा भाजपचे दक्षिण दिल्लीचे खासदार रामवीर सिंह बिधुरी यांनी सोमवारी केला. राष्ट्रपतींच्या अभिभाषणाला सोमवारी लोकसभेत चर्चेला सुरुवात करताना बिधुरी यांनी दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आम आदमी पक्षाच्या सरकारवर टीका केली. 'आप' सरकारने दिल्लीची लूट करून राष्ट्रीय राजधानीचा नरक करून टाकला असल्याचा आरोप त्यांनी केला. पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र सरकारने दिल्लीकरांसाठी गृहनिर्माण, वाहतूक, आरोग्यसेवा आणि इतर योजना सुरू केल्याचे बिधुरी म्हणाले.

> राज्यात एकाचवेळी ७० लाख मतदार वाढणे अशक्य आहे. जे पाच वर्षांतदेखील होऊ शकत नाही ते, अवघ्या पाच महिन्यांमध्ये कसे घडू शकते? हिमाचल प्रदेशची लोकसंख्या ७० लाख असून अख्ख्या हिमालच प्रदेशने महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीमध्ये मतदान केले असे म्हणायचे काय?
>
> –**राहुल गांधी,** विरोधी पक्षनेते, लोकसभा

---


# करोनानंतर अमेरिकेत तरुणांच्या मृत्यूदरात वाढ

## दहशतवाद्यांचा खात्मा केल्यानंतर ट्रम्प यांची पोस्ट

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अमेरिकी तरुणांमध्ये 'कोविड-१९'नंतरच्या काळात तरुण व्यक्तींचा मृत्यूदर अपेक्षेपेक्षा अधिक असल्याचे एका संशोधनात आढळले आहे. 'जर्नल ऑफ द अमेरिकन मेडिकल असोसिएशनने (जेएएमए) नेटवर्क ओपन'मध्ये यासंबंधीचा अहवाल प्रसिद्ध झाला आहे. या संशोधकांनी १९९९ ते २०२३ या कालावधी मरण पावलेल्या २५ ते ४४ या वयोगटातील ३३ लाख व्यक्तींच्या मृत्यूचे विश्लेषण करून हा निष्कर्ष काढला आहे.**

तरुणांचा मृत्यूदर वाढला असतानाच त्यांच्या मृत्यूची कारणे एकमेकांपासून बरीच भिन्न आहेत. त्यामध्ये अमली पदार्थ व मद्यामुळे ओढवणारे मृत्यू, हृदयविकार, मधुमेह, साखरेचे वाढलेले प्रमाण, पक्षघात, उच्च रक्तदाब, अतिचरबी यासारख्या विविध कारणांबरोबरच वाढत्या अपघाती मृत्यूंचाही समावेश आहे. त्यामुळे करोना महासाथीच्या सध्या होत असलेल्या परिणामांवर अधिक संशोधन करण्याची गरज असल्याचे संशोधकांनी म्हटले आहे. अमेरिकेतील 'युनिव्हर्सिटी ऑफ मिनेसोटा'च्या संशोधकांनी या अभ्यासात सहभाग घेतला. करोना महासाथीदरम्यान तरुणांचा मृत्यूदर मोठ्या प्रमाणात वाढला होता आणि महासाथीनंतरही तो अपेक्षेपेक्षा जास्त राहिला आहे असे संशोधकांना अभ्यासात आढळले. याचा परिणाम लोकसांख्यिकीवर होण्याची शक्यता आहे असे संशोधकांनी नमूद केले. तरुणांमधील मृत्यूदर कमी करण्यासाठी त्यांना अधिकाधिक पोषक आहार उपलब्ध करून देणे, सामाजिक सेवा योजना अधिक बळकट करणे आणि सार्वजनिक जीवनावर परिणाम करणाऱ्या उद्योगांचे अधिक नियमन करणे असे काही उपाय अभ्यासकांनी सुचवले आहेत.



अमेरिकेत २०१०च्या सुमाराला तरुणांचा मृत्यूदर कमी व्हायला लागला होता, तो करोनापश्चात वाढला आहे. महासाथीपूर्वीच्या एका दशकभराची तुलना करता, २०२३ या वर्षात २५ ते ४४ या वयोगटातील मरण पावलेल्या तरुणांची संख्या तब्बल ७० टक्क्यांनी वाढल्याचे संशोधन अभ्यासात म्हटले आहे. त्यातही २०२३ची आकडेवारी २०१०च्या आकडेवारीपेक्षा २० टक्क्यांनी जास्त आहे. जगभरात करोना महासाथीला २०१९च्या अखेरीस सुरुवात झाली होती.

> भारतामध्येही गेल्या काही वर्षांमध्ये तरुणांमध्ये अचानक मृत्यूचे प्रमाण वाढले आहे. जिम्नॅशियममध्ये व्यायाम करताना, खेळ खेळताना हृदयविकाराच्या धक्क्याने तरुण मरण पावण्याच्या घटना वाढत आहेत. त्यामध्ये निरोगी आणि स्वस्थ असलेल्या तरुणांचा समावेश दिसत असून त्यामुळे चिंता व्यक्त केली जात आहे. तरुणांमध्ये विविध कारणांमुळे मृत्यू होण्याचे प्रमाण वाढण्याची आम्हाला अपेक्षा नव्हती. ही कारणे अगदी वेगवेगळी आहेत. त्यामुळे ही पटकन उपाय सापडेल अशी साधी समस्या नाही, तर त्याचे स्वरूप अधिक व्यापक आहे.
>
> –**एलिझाबेथ रिग्ले-फिल्ड,** संशोधक, 'युनिव्हर्सिटी ऑफ मिनेसोटा'

# रिलायन्स रिफायनरीच्या वर्धापन दिनास सल्लूची हजेरी



बॉलीवूड सुपरस्टार सलमान खानने जामनगरमध्ये त्याचा ५९ वा वाढदिवस साजरा केला. त्यानंतर, त्याने अंबानी कुटुंबाबरोबर रिलायन्सच्या जामनगर येथील रिफायनरीच्या २५ व्या वर्धापन दिनाच्या सोहळ्याला हजेरी लावली. सलमानने अंबानी कुटुंबातील सदस्यांशी संवाद साधला. त्यानंतर त्याचं आयकॉनिक सुपरहिट गाणं “ओ ओ जाने जाना” सादर केलं. इव्हेंटमधील एका व्हिडीओमध्ये सलमान कोकिलाबेन अंबानीसह सर्वांना हात जोडून अभिवादन करताना दिसत आहे. आणखी एका व्हिडीओ नीता अंबानींची आई पूर्णिमा दलाल सलमानला मिठी मारताना आणि त्याच्यावर प्रेमाचा वर्षाव करताना दिसल्या. या क्लिपमध्ये सलमान श्लोका अंबानीशी संवाद साधताना दिसत आहे. सलमान खान आणि अनंत अंबानी हे दोघे खूप चांगले मित्र आहेत. सलमानने यंदा त्याचा ५९ वा वाढदिवस जामनगरमध्ये साजरा केला, या सेलिब्रेशनला त्याचे जवळचे मित्र आणि कुटुंबीय उपस्थित होते. अंबानी कुटुंबाने सलमानच्या वाढदिवसानिमित्त भव्य आयोजन केलं होतं. या सोहळ्यात सलमानची बहीण अर्पिता खान, तिचा पती आयुष शर्मा, त्याची आई सलमा खान आणि सावत्र आई हेलन यांनी हजेरी लावली होती. सलमानने कुटुंबाबरोबर वाढदिवसाचा केक कापला, तो व्हिडीओ सोशल मीडियावर खूप व्हायरल झाला होता. या सेलिब्रेशनमध्ये नीता अंबानी आणि मुकेश अंबानी देखील सलमानसाठी टाळ्या वाजवताना दिसले होते. बॉलीवूडमधील इतर पाहुण्यांमध्ये रितेश देशमुख व जिनिलीया डिसुझा यांचा समावेश होता.वाढदिवसाच्या सेलिब्रेशननंतर दबंग खान अनंत अंबानी व राधिका मर्चंटबरोबर एका मॉलमध्ये दिसला होता. त्याचे मॉलमधील काही व्हिडीओ व्हायरल झाले होते. ज्यात तो चाहत्यांना अभिवादन करताना दिसत होता. कामाबद्दल बोलायचं झाल्यास सलमान खान ए.आर. मुरुगदास दिग्दर्शित आणि साजिद नाडियादवालाची निर्मिती असलेल्या ‘सिकंदर’ या बहुप्रतिक्षित चित्रपटात दिसणार आहे. या चित्रपटात रश्मिका मंदाना, काजल अग्रवाल, सत्यराज, शर्मन जोशी आणि प्रतीक बब्बर यांच्यासह अनेक कलाकारांची मांदियाळी आहे.

## अनुराग कश्यपची बॉलीवूडबद्दल नाराजी

चित्रपट दिग्दर्शक अनुराग कश्यपने बॉलीवूडच्या सद्यस्थितीबद्दल निराशा व्यक्त केली आहे. तसेच चांगल्या कलाकृतींच्या निर्मितीसाठी तो मुंबई सोडून दाक्षिणात्य सिनेसृष्टीकडे जाण्याचा विचार करतोय, असा खुलासा त्याने केला. अनुरागने हिंदी चित्रपटसृष्टीतील नफ्याची मानसिकता, रीमेक बनवणं आणि स्टार मेकिंग संस्कृतीवर टीका केली आहे. यामुळे सर्जनशीलता कमी होते आणि कलाकृतींमध्ये नाविन्य नसतं, असं मत अनुरागने मांडलं. अनुराग कश्यप हॉलीवूड रिपोर्टरशी बोलताना म्हणाला, “आता बाहेर जाऊन प्रयोग करणं माझ्यासाठी अवघड आहे; कारण त्यासाठी खूप पैसा लागतो. निर्माते नफा आणि मार्जिनचा विचार करतात.

## प्रियंकाबाबत आईचे वक्तव्य....



बॉलीवूडमध्ये आपल्या अभिनयानं नेहमीच चाहत्यांच्या पसंतीची अभिनेत्री राहिलेल्या प्रियंका चोप्रानं हॉलीवूडमध्ये देखील दमदारपणे आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. हॉलीवूडमध्ये तिच्या चाहत्यांची संख्या मोठी आहे. सध्या विदेशात स्थायिक असणाऱ्या प्रियंकाच्या आईनं कुटूंब पद्धतीवर केलेले भाष्य चर्चेत आले आहे. प्रियंका ही अमेरिकेमध्ये तिचा पती निक जोनास याच्यासोबत राहते आहे.तिला मालती नावाची मुलगी आहे. २०१८ मध्ये तिनं निकसोबत लग्न केले होते. गेल्या काही दिवसांपासून प्रियंका आणि तिचा पती निक हे वेगवेगळ्या कारणामुळे चर्चेत आले आहे. हॉलीवूडमधील प्रतिष्ठेच्या ऑस्कर सोहळ्यामध्ये सहभागी होण्याची संधी हा दोन्ही सेलिब्रेटींना मिळाली होती. त्याची बॉलीवूडमध्ये चर्चा झाली होती. प्रियंका चोप्राची आई मधू चोप्रा यांनी सध्या एकत्र आणि विभक्त कुटूंब पद्धतीवर केलेलं भाष्य हे नेटकऱ्यांच्या चर्चेत आले आहे. डॉक्टर मधू चोप्रा या सोशल मीडियावर ॲक्टिव्ह असणाऱ्या सेलिब्रेटी आहेत. त्यांनी काही दिवसांपूर्वी प्रियंका चोप्राचे लहानपण आणि विभक्त कुटूंब पद्धती, त्याचा मुलांवर होणारा परिणाम, संस्कार यावर मोकळेपणानं प्रतिक्रिया दिली होती.

## केआरकेची मिकावर जोरदार टीका...

गायक मिका सिंगने कमाल आर खान (KRK) केआरके विरोधात वादग्रस्त आरोप केले असून, त्यावर प्रतिक्रिया देत केआरकेने आता त्याच्या यूट्यूब चॅनेलवर एक व्हिडीओ पोस्ट केला आहे. या व्हिडिओमध्ये त्याने मिकावर जोरदार टीका केली आहे आणि कपिल शर्माबरोबर झालेल्या वादाबद्दल भाष्य केले आहे. मिकाने एका मुलाखतीत सांगितले की, त्याने कपिल शर्माला केआरकेच्या घरी नेले होते, जिथे त्यांनी गोंधळ घातला होता. केआरकेने त्याच्या व्हिडीओमध्ये म्हटले, “मिका हा गाढव आहे, तो अशिक्षित आणि बेशिस्त आहे, तरी स्वत:ला गायक म्हणवतो. मिका म्हणाला होता की, मी त्याला दुबईत भेटलो होतो आणि त्याने माझ्याशी गैरवर्तन केलं. त्यानंतर त्याने सांगितलं की, त्याला काहीही आठवत नाही. होय, तो दुबईत मला भेटला होता, पण त्यानंतर सतत मला कॉल करत राहिला, म्हणून मी त्याला घरी बोलावलं. मात्र, तो आला नाही. त्याच्या मॅनेजरकडून मला समजलं की, मिकाला वाटलं की मी त्याचं अपहरण करीन. या विशेष कर्तृत्व नसलेल्या माणसाचं अपहरण करून मला काय मिळणार? तो माझ्यालेखी काहीच नाहीये.”केआरके पुढे म्हणाला, “त्याच्या मॅनेजरने मला त्याच्या हॉटेलवर बोलावले. तिथे हनी सिंगही होता, ज्याचं मोठं सूट (मोठा रूम होता), तर मिकाचा छोटासा रूम होता. मिकाने मला त्याच्या शोला यायचे आमंत्रण दिलं , पण मी मला काम आहे असं सांगून गेलो नाही.”मुंबईतील एका घटनेचा उल्लेख करत केआरके म्हणाला की, त्याच्या सुरक्षारक्षकांनी मिका आणि कपिलला त्याच्या घरी मद्यधुंद अवस्थेत आल्यावर चापट मारली होती.

## 'पंचक'ची चित्रपटाची सर्वत्र जोरदार चर्चा



डॉ. श्रीराम नेने आणि माधुरी दीक्षित नेने निर्मित 'पंचक' हा चित्रपट प्रदर्शित व्हायला अवघे काही दिवस असतानाच आता या चित्रपटाचा आणखी एक उत्कंठावर्धक ट्रेलर प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. गेल्या काही दिवसांपासून या चित्रपटाची सर्वत्र जोरदार चर्चा सुरु आहे. इतकेच नाही तर बॉलिवूडमधील काही नामवंत कलाकारांनी 'पंचक'च्या ट्रेलरचे भरभरून कौतुक केले आहे. नवीन वर्षात प्रदर्शित होणारा हा चित्रपट मल्टीस्टारर आहे. अशातच चित्रपटाचा नवीन ट्रेलर भेटीला आलाय. 'पंचक'च्या पहिल्या ट्रेलरने खूप उत्सुकता निर्माण केली होती. त्यात आता या दुसऱ्या ट्रेलरने अधिक भर टाकली आहे. खोतांच्या घराला पंचक लागल्याने 'आता कोणाचा नंबर ?' हा प्रश्न अवघ्या घराला पडलेला असतानाच, अनेक जण आपापल्या परीने हे संकट टाळण्याचा प्रयत्न करत आहेत. या सगळ्या गोंधळात घरात सर्कस होत आहे, ऑपेराही होताना दिसत आहे. त्यामुळे आता पुढे काय होणार हे, याचे उत्तर प्रेक्षकांना ५ जानेवारी रोजी मिळणार आहे. कथा, दिग्दर्शन, कलाकार, संगीत या सगळ्याच चित्रपटाच्या जमेच्या बाजू आहेत. चित्रपटाबद्दल माधुरी दीक्षित नेने म्हणतात, "या चित्रपटाच्या क्रिएटिव्ह बाबींमध्ये मी विशेष लक्ष घातले आहे. पडद्यावरील आणि पडद्यामागील प्रत्येकाची निवड ही योग्य आहे. चित्रपट पाहताना याचा प्रत्यय प्रेक्षकांनाही नक्कीच येईल. प्रत्येक कलाकार त्या व्यक्तिरेखेत चपखल बसला आहे.

# एवढं 'मोहोळ' का उठलंय?

## जितेंद्र आव्हाड यांचा कुस्तीत राजकारण शिरल्याचा आरोप

| मुंबई | वृत्तसंस्था : महाईन्यूज

**महाराष्ट्र केसरी २०२५ च्या उपांत्य फेरीच्या सामन्यात पृथ्वीराज मोहोळ आणि शिवराज राक्षे एकमेकांविरूद्ध भिडले. या सामन्यात मोठा गोंधळ झाल्याचे पाहाया मिळले. या लढतीचा निर्णय अवघ्या ४० सेकंदात झाला आणि पंचांनी पृथ्वीराज मोहोळ विजयी झाल्याचं घोषित केले. यानंतर शिवराज राक्षेने पंचांशी हुज्जत घातली व्हिडिओ रिव्ह्यू पाहून निर्णय देण्याची मागणी केली. पण राक्षेच्या मागणीकडे पंचांनी दुर्लक्ष केले. यानंतर शिवराजने पंचांशी बोलताना त्यांची कॉलर धरली इतकेच नाही तर त्यांना लाथदेखील मारली. यानंतर शिवराज राक्षेवर कुस्तीगीर परिषदेने ३ वर्षांच्या निलंबनाची कारवाई केली आहे. दरम्यान या सर्व प्रकराचे पडसाद आता राजकीय वर्तुळातही उमटताना दिसत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे आमदारा जितेंद्र आव्हाड यांनी यासंबंधी एक पोस्ट केली असून ज्यामध्ये त्यांनी "ही कुस्ती फिक्स होती", असा खळबळजनक दावा केला आहे. याबरोबरच त्यांनी "एवढं 'मोहोळ" का उठले? कारण... राजकारण", असंही म्हटलं आहे.**



महाराष्ट्र केसरीची कुस्ती खरंच फिक्स होती?

जितेंद्र आव्हाडांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर केलेल्या पोस्टमध्ये महाराष्ट्र केसरीची लढत फिक्स होती असं म्हटलं आहे. आव्हाड म्हणालेत की, "काल महाराष्ट्र केसरी स्पर्धेच्या उपांत्य फेरीचा सामना झाला अन् आश्चर्यकारक निकाल लागला. या उपांत्य फेरीच्या लढतीचा व्हिडिओ मी खाली टाकला आहे. हा व्हिडिओ कुणीही बघू शकतो. शिवराज राक्षेची पाठ जमिनीला लागलीच नाही; त्याची कूस जमिनीवर लागली. शिवराजची कूस जमिनीला लागल्यावर पृथ्वीराज मोहोळ कुस्ती जिंकला, असे जाहीर करण्यात आले. कूस लागल्यावर प्रतिस्पर्धी जिंकत नसतो, हे सांगण्यासाठी कोणा कुस्तीतज्ज्ञाची गरज नाही. कारण, मातीला पाठ लागली तरच चितपट घोषित केले जाते. ही तर मॅटवरची कुस्ती आहे, त्यामुळे सगळेच स्पष्ट दिसतेय. सध्याच्या टीव्ही कॅमेरांमुळे तर अधिकच स्पष्टता येते. म्हणूनच ही कुस्ती फिक्स होती... मॅच फिक्सिंग होती, हे उभ्या महाराष्ट्राला कळले आहे."

### कुस्तीत राजकारण शिरलंय?

पुढे आव्हाडांनी कुस्तीत राजकारण शिरल्याचा आरोपही केला आहे, ते म्हणाले की, "कुस्तीत हे कुठलं राजकारण शिरलंय. जे खरोखरच ताकदीचे आणि मेहनतीने पुढे आलेले पैलवान आहेत; त्यांना राजकारण करून मागे ढकलण्याचे काम सिकंदर शेखपासून सुरू झाले आहे. आज मला एका गोष्टीचा प्रकर्षाने उल्लेख करावासा वाटतो, जो प्रकार रागावून, अन्याय झाल्याने शिवराज राक्षेने पंचांसोबत केला. तोच जर सिकंदर शेखने केला असता तर आतापर्यंत सिकंदर शेखच्या अख्ख्या खानदानाची, त्याच्या आई-बहिणीची लाज रस्त्यावर निघाली असती. टोलधाडीने त्याला छळ ... छळ छळला असता. पण, त्याने शांतपणे अन्याय सहन केला आणि परत अन्यायावर मात करून महाराष्ट्र केसरी किताब जिंकला".

### एवढं मोहोळ का उठलंय?

"असो, पण या कुस्तीमध्ये खरा जिंकला तो शिवराज राक्षेच! ठरवून पृथ्वीराज मोहोळ याला जिंकविण्यात आले. अंतिम फेरीतही महेंद्र गायकवाड यानेही पंचांच्या पक्षपाती धोरणाचा निषेध करीत मैदान सोडले. महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेच्या दुधात विरजण कोण घालतंय? एवढं 'मोहोळ' का उठले? कारण... राजकारण!", असंही जितेंद्र आव्हाड त्यांच्या पोस्टमध्ये म्हणालेत.

---

# "लाथ काय अशा पंचांना गोळ्या घालत्या पाहिजेत!

## डबल महाराष्ट्र केसरी चंद्रहार पाटलांचा शिवराज राक्षेला पाठिंबा

| अहिल्यानगर | प्रतिनिधी : महाईन्यूज

**अहिल्यानगर येथे २ फेब्रुवारीला प्रतिष्ठित महाराष्ट्र केसरी २०२५ चा उपांत्य फेरी आणि अंतिम फेरीचा सामना खेळवण्यात आला होता. या स्पर्धेत पुण्याचा पैलवान पृथ्वीराज मोहोळने बाजी मारत मानाची गदा पटकावली. पण अंतिम फेरीदरम्यान त्याचा प्रतिस्पर्धी पैलवान महेंद्र गायकवाड याने पंचांच्या निर्णयाविरोधात मैदान सोडल्याने त्याला विजयी घोषित करण्यात आले. पण तत्पूर्वी शिवराज राक्षेने देखील उपांत्य फेरीच्या सामन्यात पंचांच्या निर्णयाविरूद्ध मोठा वाद घातला.**



पृथ्वीराज मोहोळ आणि शिवराज राक्षे यांच्यातील उपांत्य फेरीचा निकाल पंचांनी अवघ्या ४० सेकंदात दिला होता. पण शिवराजने खांदे जमिनीला टेकले नसल्याचे सांगत पंचांकडे रिव्ह्यूची मागणी केली. पण पंचांनी त्याच्या या मागणीकडे दुर्लक्ष केलं. शिवराजसह त्याचे प्रशिक्षक आणि त्याच्या समर्थकांनीही त्याचे खांदे खाली टेकले नव्हते त्यामुळे रिव्ह्यू पाहून निर्णय द्यावा असे सांगितले. शिवराजने पंचांनी विनंती देखील केली, पण पंचांनी काही प्रतिसाद दिला नाही. यानंतर संतापलेल्या शिवराजने पंचांची कॉलर धरली आणि त्यांनी लाथदेखील घातली, ज्याचा व्हीडिओ व्हायरल झाला. पंचांबरोबर गैरवर्तन केल्याप्रकरणी कुस्तीगीर परिषदेने शिवराज राक्षेवर तीन वर्षांची निलंबनाची कारवाई केली आहे. यानंतर आता डबल महाराष्ट्र केसरी चंद्रहार पाटील यांनी मोठं वक्तव्य केलं आहे. पैलवान चंद्रहार पाटील यांनी माध्यमांशी संवाद साधताना सांगितलं, "खरंतर काल जे घडलं ते चुकीचं झालं. खरंतर शिवराजच्या बाबतीत जे घडलं त्यामध्ये पृथ्वीराजची चूक नाही आणि शिवराजची देखील चूक नाही. तिथे चूक फक्त त्या मॅटवर असणाऱ्या पंचांची चूक आहे." "शिवराजच्या बाबतीत जो प्रकार घडला हाच प्रकार माझ्या बाबतीत तिसऱ्यांदा महाराष्ट्र केसरी होत असताना घडला. त्यावेळेस मी अनेक गोष्टींचा विचार केला नव्हता. पण याचा विचार न करता शिवराजने पुढे गेलं पाहिजे. शिवराजकडून काही चुका झाल्या, शिवराजने लाथ घातली ही खरंतर चूक झाली, असं मी मीडियाच्या माध्यमातून म्हणालो होतो. पण शिवराजने खरंतर जो पंच होता अशा पंचांना गोळ्या घातल्या पाहिजे, कारण शिवराज राक्षेची कुस्ती आज आपण पाहिली तर गेल्. या १५-२० वर्षांची त्याची तपश्चर्या आहे. त्या २० वर्षांच्या तपश्चर्येनंतर तो आता कुठेतरी तिसऱ्यांदा महाराष्ट्र केसरीच्या गदेपर्यंत पोहोचला होता आणि १० सेकंदात जर तुम्ही त्याचं आयुष्य उद्धवस्त करून टाकताय ते पण एका पंचाच्या चुकीमुळे... खरंतर या पंचांना अशा पद्धतीची शिक्षा जर मिळाली तर भविष्यात कुस्ती क्षेत्रात कुठेतरी पंचांवर वचक बसेल", असं चंद्रहार पाटील यांनी मोठं वक्तव्य करत शिवराजच्या वागण्याला पाठिंबा दिला.

### जे काही घडलंय ते पूर्ण चुकीचं

शिवराज राक्षेच्या बाबतीत हे जे काही घडलंय ते पूर्ण चुकीचं आहे आणि या सगळ्यामध्ये चूक फक्त मॅटवर असणाऱ्या पंचांची आहे, असं स्पष्ट वक्तव्य चंद्रहार पाटील यांनी केलं. स्वत: डबल केसरी असणाऱ्या चंद्रहार पाटील यांच्याबरोबर २००९ च्या कुस्ती स्पर्धेतील अंतिम फेरीत पंचांच्या निर्णयाचा असाच फटका बसला होता. यानंतर त्यांनी आत्महत्येचा प्रयत्न केल्याचे देखील सांगितले. पण चंद्रहार पाटील यांनी शिवराज राक्षेला कोणताही विचार न करता पुढे जात राहण्याचे सांगितले.

# आगामी काळात लेखापालांची मोठी गरज!

## शिक्षण विश्व: शिक्षण विश्व; प्रा. रामकृष्ण मोरे महाविद्यालयात व्यवस्थापन सप्ताह व्याख्यानमाला




। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**हल्लीच्या विपणन किंवा अकाउंटिंग क्षेत्र हे सर्वव्यापी आहे. अकाउंटिंग क्षेत्रात विद्यार्थ्यांना करिअरच्या दृष्टीने चांगल्या संधी उपलब्ध आहेत. अकाउंटंट अर्थात लेखापालांची आज नितांत गरज असताना, आगामी काळात त्यांची गरज आणखी वाढेल असे मत आकुर्डी येथे व्याख्यानमालेत व्यक्त करण्यात आले.**

प्रा. रामकृष्ण मोरे महाविद्यालय, आकुर्डी येथे वाणिज्य विभागाच्या अंतर्गत पाच दिवसीय (३ ते ७ फेब्रुवारी ) व्यवस्थापन सप्ताह व्याख्यानमालेचे आयोजन केले आहे. सी. ए. विजय क्षीरसागर व सी. ए. अरुण रिंगणे, गायकवाड व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अभय खंडागळे यांच्या हस्ते उदघाट्न झाले. यावेळी उपप्राचार्य डॉ. हिरालाल सोनावणे, वाणिज्य विभागप्रमुख डॉ. पद्मावती इंगोले, समन्वयक डॉ. दिलीप कोतकर, डॉ. रामदास लाड, डॉ. स्वाती जगताप व इतर प्राध्यापक वर्ग उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात स्वागत गीत व दीपप्रज्वलनाने झाली. व्यवस्थापन सप्ताहाच्या अंतर्गत आयोजित व्याख्यानमालेसाठी प्रथम पुष्प गुंफण्यासाठी सी. ए. विजय क्षीरसागर व सी. ए. अरुण रिंगणे प्रमुख पाहुणे व वक्ते म्हणून लाभले. सी.ए. विजय क्षीरसागर यांनी वाणिज्य क्षेत्रातील तसेच अकाउंटिंग क्षेत्रातील विविध संधी यावर विद्यार्थ्यांशी हितगुज केले. तर सी. ए. अरुण रिंगणे यांनी “आत्मविश्वास व संघर्ष” या सगळ्या गोष्टींवर विद्यार्थ्यांशी संवाद साधला व विद्यार्थ्यांना प्रेरित केले. विपणन क्षेत्र सर्वव्यापी आहे. विद्यार्थ्यांना अनेक प्रकारच्या कौशल्यांचा विकास करण्यासाठी यात संधी मिळते. यामध्ये टीमवर्क, नेतृत्व, संवाद साधण्याची क्षमता, माहिती तंत्रज्ञान यांचा समावेश होतो. असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य आदरणीय डॉ. अभय खंडागळे सर यांनी विद्यार्थ्यांना अशा कार्यक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या अंतर्गत व्यक्तिमत्त्वाला आकार मिळतो व यासाठी विद्यार्थ्यांनी अशा कार्यक्रमाचे आयोजन व अशा कार्यक्रमांचा अनुभव देखील घेतला पाहिजे असे प्रतिपादन केले. वाणिज्य विभागाच्या अधिष्ठाता तथा प्रमुख डॉ. पद्मावती इंगोले मॅडम यांनी विद्यार्थ्यांना असेच कार्यक्रम चांगल्या पद्धतीने राबवावेत असे मार्गदर्शन केले.

संपूर्ण व्यवस्थापन सप्ताहाचे समन्वयक म्हणून वाणिज्य विभागाचे डॉ. दिलीप कोतकर यांनी काम पाहिले. वाणिज्य विभागाचे डॉ. रामदास लाड व डॉ. स्वाती जगताप यांनी नियोजन केले. त्यांना वाणिज्य विभागातील इतर सर्व प्राध्यापकांनी सहकार्य केले. विद्यार्थी प्रतिनिधी कु. आर्या चौधरी यांनी सूत्रसंचालन केले. विद्यार्थी प्रतिनिधी हर्षदा तनपुरे, आरती चिकटे यांनी मान्यवरांचा परिचय करून दिला. आभारप्रदर्शन सूरज सुर्वे यांनी व्यक्त केले. . डॉ. अर्चना माळी, डॉ. शुभांगी भालेकर प्रा. विक्रांत शेळके, प्रा. सरिता भंडारी, प्रा. सुशील गायकवाड, प्रा. वर्षा ढमाले, प्रा. प्रियांका वटकर, प्रा. सुप्रिया बिराजदार, प्रा. चंद्रकांत कुंभार, प्रा. रेश्मा रोडे, प्रा. नेत्रा लोहकरे, प्रा. रिटा वर्मा यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमास विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

---

# कायद्याचे ज्ञान नाही, अंमलबजावणी महत्त्वाची; ॲड. मंगेश खराबे

## नवीन फौजदारी कायद्यांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी कार्यशाळा




। पिंपरी- चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**कायद्याच्या अंमलबजावणीमध्ये फक्त कायद्याचे ज्ञान महत्त्वाचे नाही. तर त्या कायद्यांचे प्रत्येकाने पालन करणे यातून समाजावर होणाऱ्या परिणामांची जाणीव ठेवणे आवश्यक आहे असा सूर कार्यशाळेत व्यक्त करण्यात आला.**

नवीन फौजदारी कायद्यांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी चिखली पोलिस स्टेशन द्वारे कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते यावेळी प्रमुख वक्ते बोलत होते. कार्यशाळेमध्ये ॲड. मंगेश खराबे आणि ॲड. प्रीती साठे यांनी नवीन बीएनएस, बीएनएसएस, बीएसए या तीन नवीन कायद्यांबद्दल सखोल मार्गदर्शन केले.कार्यशाळेसाठी चिखली पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विठ्ठल साळुंखे यांनी पुढाकार घेतला.

ही कार्यशाळा इंद्रप्रस्थ गार्डन मंगल कार्यालय, पाटील नगर, चिखली गाव येथे संपन्न झाली. कार्यशाळेत माजी नगरसेवक संतोष मोरे, हवेलीचे माजी उपसभापती सुभाष मोरे, माजी नगरसेविका साधना मळेकर, तसेच दत्तूनाना मोरे, माऊली तापकीर, जयवंत मोरे, पंडित मोरे, रामभाऊ भांगरे, शंकर मोरे, नारायण भुजबळ, ॲड.संपत भुजबळ, ॲड. निलेश टिळेकर, आयबीएम कॉलेज , चिखली ग्रामस्थ, प्रतिष्ठित नागरिक, ज्येष्ठ नागरिक, महिला दक्षता कमिटी, महिला भरोसा सेल, शांतता कमिटी, शाळांचे प्राचार्य, मुख्याध्यापक, कंपनी व वर्कशॉपचे मालक आणि व्यवस्थापक सहभागी झाले होते.

ॲड. मंगेश खराबे म्हणाले की, आजच्या गतिमान आणि बदलत्या समाजात, प्रत्येक नागरिकाला आपल्या अधिकारांबद्दल जागरूक असणे, आणि त्यांचा योग्य वापर करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. याच हेतूने, पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या अंतर्गत चिखली पोलीस स्टेशनने भारतीय न्याय संहिता, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता आणि भारतीय साक्ष अधिनियम या नव्या कायद्यांवर कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. ॲड साठे म्हणाले की, नागरिकांचा कायदेशीर दृष्टिकोन बदलणे, त्यांना प्रेरित करणे आणि एक अधिक सुरक्षित व समृद्ध समाज निर्माण करणे. हेच बदलत्या कायद्याचे वैशिष्ट्य आहे.

# ‘द्विभाषिक कौशल्य उद्योग व्यवसायाच्या वाढीसाठी आवश्यक’; अच्युत कुमठेकर



। पिंपरी- चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

भारत आणि जपान मध्ये आयटी आणि कॉर्पोरेट क्षेत्रात द्विभाषिक व्यावसायिकांना खूप मागणी आहे. त्यामुळे पुढील काळात भारतीय भाषेसह जपानी भाषा अवगत असणाऱ्या विद्यार्थ्यांना भारतासह जपानमध्ये देखील करिअर आणि उद्योग व्यवसाय उभारण्यास खूप मोठ्या संधी उपलब्ध होणार आहेत. यामुळे भारत आणि जपान मध्ये उद्योग, व्यवसाय, रोजगार वाढण्यास मदत होईल असे प्रतिपादन आयटी इन्फ्रास्ट्रक्चर ऑपरेशन्स मॅनेजर अच्युत कुमठेकर यांनी केले.

पिंपरी-चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीईटी) साते, वडगाव मावळ येथील पिंपरी चिंचवड विद्यापीठ (पीसीयू) येथे ‘डिस्कव्हर जपान’ या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केले होते. यावेळी जपानी लँग्वेज टीचर्स असोसिएशन ऑफ पुणे चे संस्थापक सदस्य हरी दामले, पीसीयूच्या कुलगुरू डॉ. मनीमाला परी, प्र-कुलगुरू डॉ. सुदीप थेपडे, परदेशी भाषा समन्वयक डॉ. करुणा भोसले, एसजीएस एज्युनेट कंपनीच्या व्यवस्थापकीय संचालक क्षिप्रा पोतदार, पिंपरी चिंचवड ओरिगामी सेंटरच्या प्रमुख स्वाती धर्माधिकारी आदी उपस्थित होते.


Golden opportunity for Pune & PCMC student's
GURUKUL ONLINE CLASSES
YOUR CHILD'S FUTURE IS OUR PRIORITY
Nursary to 7th
All Subjects, Only Special Subject Available..
Math's, EVS, All language
Admission Open
Batch Starts 7th June 2023
MORE INFO
96577 67000 / 70209 85375
EXPRESS MEDIA ENTERPRISES
आजच प्रवेश निश्चित करा...आणि निश्चिंत रहा..!


DP Enterprises
one call problem solve
PEST CONTROL
ELECTRICIAN
PAINTING
PLUMBING
All Maintenance Services
Pimpri-Chinchwad, Pune.
PRICE
QUALITY
SERVICE
we provide all types of home services.
CONTACT :- 86000 60593 / 99214 66191


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
Documentary
Weddings
Drone
Motion Graphics
Testimonials
Tutorial videos
Product Videos
Animation
Social Media Content
Promotional Videos
Real Estate
Corporate
Advertising
Events
PUNE
Contact : 9657767000 / 9370493922